# जमीन प्रशासन अन् महसूल प्रक्रिया सुलभ होणार

## मुंबई शहर व उपनगर जिल्हाधिकाऱ्यांची रिअल इस्टेट संस्थांसोबत संयुक्त बैठक

**मुंबई, दि. २६ : विशेष प्रतिनिधी**

जमीन प्रशासन अधिक समन्वयित, पारदर्शक आणि सुधारणा-केंद्रित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले आहे. त्यासाठी मुंबई शहराच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल आणि मुंबई उपनगरीय जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी क्रेडाई-'एमसीएचआय', 'नरेडको', 'बीडीए' आणि 'पीईएटीए' या प्रमुख रिअल इस्टेट संस्थांच्या प्रतिनिधींसह दोन्ही जिल्हाधिकारी कार्यालयांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेतली. यामध्ये दोन्ही जिल्हाधिकारी कार्यालयांसोबत विविध बांधकाम व्यावसायिक संघटनांची एकत्रित चर्चा करण्यात आली आहे.

याबैठकीत 'क्रेडाई-एमसीएचआय'चे सचिव ऋषी मेहता आणि मनन शाह यांनी सविस्तर मांडणी केली. उत्खननात निघालेल्या मातीवर आकारली जाणारी रॉयल्टी, विशेषतः प्रकल्प स्थळाबाहेर सामग्री वाहतूक न होत असताना रॉयल्टी वगळण्याची आवश्यकता, अल्प वैधता कालावधी, उत्खनन प्रमाण मोजणीतील तांत्रिक त्रुटी आणि मंजुरी प्रक्रियेत होणारे विलंब या प्रमुख अडचणींवर त्यांनी लक्ष वेधले.



### 'एसओपी'-आधारित यंत्रणा राबवण्यास कटिबद्ध

आंचल गोयल यांनी सांगितले की, रॉयल्टीची लागू शक्यता, प्रक्रियात्मक कालमर्यादा आणि सर्वेक्षणातील पुनरावृत्ती हे बांधकाम व्यावसायिकांनी उपस्थित केलेले महत्त्वाचे मुद्दे असून त्यावर पद्धतशीर सुधारणा करणे आवश्यक आहे. कायदेशीर अनुपालन राखत प्रक्रिया सुलभ करणाऱ्या, अस्पष्टता कमी करणाऱ्या आणि सुसंगतता सुनिश्चित करणाऱ्या स्पष्ट 'एसओपी'-आधारित यंत्रणा राबवण्यास दोन्ही जिल्हाधिकारी कार्यालये कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

'क्रेडाई-एमसीएचआय'चे अध्यक्ष सुखराज नाहर म्हणाले, ''चर्चेत आलेले मुद्दे दीर्घकाळ प्रलंबित आहेत. एसओपी-आधारित प्रक्रिया, एकत्रित सर्वेक्षण आणि दोन्ही जिल्हाधिकारी यांची संयुक्त सुकाणू समिती स्थापन करण्याबाबतची वचनबद्धता ही व्यावहारिक आणि कालबद्ध सुधारणा घडवून आणण्याच्या सामायिक इच्छेचे द्योतक आहे. यामुळे पारदर्शकता वाढेल आणि व्यवसाय सुलभतेला चालना मिळेल.''

'नरेडको महाराष्ट्र'चे अध्यक्ष कमलेश ठाकूर यांनी सांगितले की, ही बैठक सहयोगी धोरणनिर्मितीच्या दिशेने एक निर्णायक वळण आहे. रॉयल्टी, सर्वेक्षण आणि मंजुरी प्रक्रियेतील एसओपी-आधारित स्पष्टतेमुळे संपूर्ण रिअल इस्टेट परिसंस्थेत अंदाज क्षमता आणि विश्वास मोठ्या प्रमाणात वाढेल.

'बीडीए'चे अध्यक्ष विक्रम मेहता आणि 'पीईएटीए'चे अध्यक्ष संदीप इसोर यांनी एकत्रितपणे नमूद केले की, एकसंध प्रक्रिया आणि सुधारित कार्य पद्धतीमुळे प्रकल्पांतील ऑपरेशनल विलंब लक्षणीयरित्या कमी होतील.

### उपाययोजनांची व्यावहारिक आणि कालबद्ध अंमलबजावणी करणार

सौरभ कटियार यांनी सांगितले की, मुंबई शहर आणि उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय एकाच मंचावर आणल्याने समन्वित प्रशासन, एकसमान निर्णय प्रक्रिया शक्य होते. एकत्रित भौतिक सर्वेक्षण, सुव्यवस्थित एकत्रीकरण आणि उपविभाजन प्रक्रिया यांसह जमिनीच्या नोंदींमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सूचवलेल्या उपाययोजनांची व्यावहारिक व कालबद्ध अंमलबजावणी संरचित संस्थात्मक यंत्रणेमार्फत केली जाईल.